# बेस्ट वार्ता

ऑगस्ट - डिसेंबर २०२३ वर्ष-९, अंक-२
पृष्ठे : ४४ किंमत : विनामुल्य



# बेस्ट स्वातंत्र्य दिन सोहळा -२०२३ ची निवडक क्षणचित्रे








बेस्टच्या विविध योजनांची माहिती घेण्यासाठी केरळ राज्याचे परिवहन मंत्री मा. श्री. अँथनी राजु यांनी
बेस्ट उपक्रमाला भेट दिली. त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना बेस्टचे महाव्यवस्थापक मा. श्री. विजय सिंघल






# बेस्ट वार्ता

ऑगस्ट - डिसेंबर २०२३


**संपादक**
सुदास सावंत

**कार्यकारी संपादक**
सत्यवान इथापे

**संपादन सहाय्य**
राजेश खानोलकर
महेश काळे

**छायाचित्रे**
प्रशांत मयेकर
दिपक कारेमोरे


## अंतरंग


१. वृत्तविशेष ................................४
२. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी ........८
३. कविता ................................१०
४. लेख ..................................११
५. कला आणि क्रीडा ......................१४
६. विविध कार्यक्रमांची छायाचित्रे ..........१८
७. लेख ................................ २९
८. अभिनंदन - उच्च माध्यमिक/पदविका ....३६
९. प्रतिसाद ..............................३८
१०. जीवेत शरदः शतम ....................४१


"बेस्ट वार्ता" अंक www.bestundertaking.com या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. तसेच यापुढील बेस्ट वार्ताचे डिजीटल स्वरुपातील अंक"बेस्ट परिवार" या ॲपवर उपलब्ध करुन देण्यात येतील. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. - संपादक

# बेस्टच्या विविध योजनांची माहिती संदर्भात केरळ राज्याचे परिवहन मंत्री मा. श्री. अँथनी राजु यांची बेस्ट उपक्रमाला भेट

सध्या बेस्ट उपक्रमाच्या बसताफ्यामध्ये जास्तीत जास्त इलेक्ट्रिक बसगाड्यांचा समावेश आहे आणि या पुढेही बेस्ट उपक्रमाच्या ताफ्यामध्ये येणाऱ्या सर्व बसगाड्या इलेक्ट्रिक असतील, तसेच २०२७ या वर्षांपर्यंत बेस्ट उपक्रमाच्या बसताफ्यामध्ये १००% इलेक्ट्रिक बसगाड्यांचा समावेश असेल. बेस्ट उपक्रमाच्या या निर्णयाचा, फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अॅण्ड इंडस्ट्रिज (एफ.आय.सी.सी.आय.) या भारतामधील मोठ्या आणि जुन्या शिखर व्यवसायसंस्थेने दखल घेतली असून बेस्ट उपक्रमाला, ''स्मार्ट परिवहन'' या शहरी प्रवर्गामधील नाविन्यपूर्ण कामासाठी सर्वोच्च सन्मान देऊन गौरविले आहे. या बाबींची दखल घेऊन आणि बेस्ट उपक्रमाच्या विविध योजनांची माहिती मिळविण्याच्या संदर्भात स्वत: मा. श्री. अँथनी राजु-परिवहन मंत्री, केरळ राज्य यांनी कुलाबा येथील बेस्ट उपक्रमाच्या मुख्यालयाला १७.१०.२०२३ रोजी भेट दिली आणि त्यांनी बेस्ट उपक्रमाचे महाव्यवस्थापक श्री. विजय सिंघल, भा.प्र.से. यांच्याशी चर्चा करून माहिती घेतली.

मा. श्री. अँथनी राजु, परिवहन मंत्री. केरळ राज्य यांनी भेटी दरम्यान इलेक्ट्रिक वातानुकूलित दुमजली बसगाडी, प्रिमियम बस सेवा, डिजिटल टिकीटींग, नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान आणि पध्दती या संदर्भात चर्चा केली. चर्चे दरम्यान त्यांनी उपक्रमाची भारतातील पहिल्या / एकमेव वातानुकुलित इलेक्ट्रिक दुमजली बससह सर्वात मोठ्या इलेक्ट्रिक बस गाड्यांचा ताफा सुरू करणे, इलेक्ट्रिक बस गाड्यांचे प्रवर्तन करण्याकरीता चार्जिंग सुविधा, भारतातील कोणत्याही शहरामधील / राज्य बस उपयोगिता पहिले नॅशनल कॉमन मोबीलिटी कार्ड सुरू करणे, नविन डिजिटल टिकीटींग पर्याय प्रदानासह बेस्ट चलो अॅपद्वारे पूर्ण जगामध्ये पहिल्यांदाच प्रवाशांची प्रत्यक्ष स्थिती देऊ करणे, प्रिमीयम बससेवा, आणि परिवहन एक-सेवा (एमएएएस) या संकल्पनेची अंमलबजावणी करणारी भारतामधील पहिली परिवहन संस्था, यासह बेस्ट उपक्रमाच्या हरित प्रवास याबाबतची सविस्तर माहिती घेतली आणि सखोल चर्चा केली. त्यांनी बेस्ट उपक्रमाच्या नाविन्य वाहतुक व्यवस्थापन प्रणाली (आय.टि.एम.एस.) याचीही माहिती घेतली. बेस्ट उपक्रमाच्या इलेक्ट्रिक वाहन धोरणाअंतर्गत इलेक्ट्रिक दुमजली बसगाड्यांसह मोठ्या प्रमाणात इलेक्ट्रिक बसगाड्या उपक्रमाच्या ताफ्यामध्ये समाविष्ट करण्याच्या निर्णयाची त्यांनी प्रशंसा केली.

इलेक्ट्रिक बसगाड्यांच्या प्रवर्तनाविषयी अधिक माहिती जाणुन घेण्यासाठी श्री. अँथनी राजु यांनी कुलाबा आणि बॅकबे आगाराला देखील भेट देऊन आगार व्यवस्थापक व टाटा मोटर्स कंपनीचे अधिकारी यांच्याशी चर्चा करून वातानुकूलित इलेक्ट्रिक दुमजली बसगाड्यांचे प्रवर्तन, आसन व्यवस्था, इलेक्ट्रिक बसगाड्या चार्जिंग करण्याच्या पायाभुत सुविधांची माहिती आणि गाड्यांची देखभाल-दुरूस्ती करिता असलेल्या सुविधेचा आढावा घेतला. या दरम्यान त्यांनी आगारातील कर्मचारी आणि अधिकारी यांच्याशीही सुसंवाद साधुन वातानुकूलित इलेक्ट्रिक दुमजली बसगाड्यांचे प्रवर्तन करण्या संबधीचे अनुभव आणि आव्हाने या विषयी माहिती घेतली.

श्री. विजय सिंघल, महाव्यवस्थापक बेस्ट उपक्रम यांनी असे प्रतिपादन केले की, ''मुंबईतील प्रवाशांना आरामदायी, विश्वासार्ह, पर्यावरण स्नेही आणि आर्थिक दृष्ट्या दिर्घकाळ टिकणारी सार्वजनिक बस वाहतुक सेवा प्रदान करण्यासाठी बेस्ट उपक्रम सदैव कटीबध्द आहे.''

# ‘अर्पण ’स्वयंसेवी संस्था आणि बेस्टच्या माध्यमातून बालकांचे हक्क व सुरक्षेवर भर देणारे अभियान १४ ते २० नोव्हेंबर या दरम्यान राबविण्यात आले.

कुलाबा येथील बेस्ट भवनात ‘**अर्पण** ’ स्वंयसेवी संस्था आणि बेस्टच्या माध्यमातून १४ ते २० नोव्हेंबर २०२३ या दरम्यान बालकांचे हक्क व सुरक्षिततेवर भर देणारे ‘बाल धोरण ’ आखणारे अभियान राबविण्यात आले. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी महाराष्ट्र राज्याच्या महिला आणि बालविकास विभागाच्या मंत्री मा. आदिती तटकरे,‘बेस्ट ’ उपक्रमाचे महावस्थापक विजय सिंगल, ‘अर्पण ’ संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पूजा तापरीया व अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

‘सेफ टच अनसेफ टच’ या बाबत बहुतांश लहान मुलांना काहीही कल्पना नसते आई वडील मुलाचे पहिले गुरू असले तरी मुले शिक्षकांचे अधिक ऐकतात त्यामुळे बाल लैंगिक शोषण रोखण्यासाठी शाळा व शिक्षकांनी मुलांमध्ये जनजागृती निर्माण करणे गरजेचे आहे असे मत मंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्त केले.

अर्पण संस्था व बेस्ट उपक्रमाने जनजागृतीसाठी बसेसमध्ये पोस्टर्स, व्हिडिओ क्लिपव्दारे जनजागृती मोहीम राबविणे हा खूप चांगला उपक्रम आहे व या मोहिमेसाठी बेस्ट उपक्रमाने लगेच होकार दिल्याबद्दल महाव्यवस्थापक, विजय सिंघल यांचे कौतुक केले. तसेच अर्पण’ संस्थेने ‘बेस्ट’ बरोबर ’राज्य परिवहन विभागालाही या मोहिमेत सहभागी करून घेतल्यास राज्यभर या मोहिमेचा प्रसार होईल असे सुचविले.

या कार्यक्रमा प्रसंगी महाव्यवस्थापक विजय सिंघल आपल्या भाषणात म्हणाले की, अर्पण सोबतची भागीदारी केवळ एक सहयोग नाही तर हे मुंबईकरांना दिलेले वचन आहे. प्रत्येक दिवशी प्रवासी उपक्रमाबद्दल जो विश्वास दाखवितात त्याची आम्हाला जाण आहे आणि आम्ही या जबाबदारीकडे गांभीर्याने पहातो. बेस्ट बसमधील प्रत्येक प्रवास प्रवाशांसाठी विशेषतः आमच्या सर्वात लहान प्रवाशांसाठी सुरक्षित करण्यासाठी आम्ही पूर्णपणे कटीबद्ध आहोत. अर्पण या संस्थेसोबत आम्ही बाल लैंगिक शोषण याबाबतची जागरुकता वाढविण्यासाठी, आमच्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करण्यासाठी आणि  आमच्या शहरातील मुलांच्या कल्याणासाठी योगदान देण्यासाठी अथक काम करत राहू अशी ग्वाही दिली.



















# बेस्ट उपक्रमाचे १२३ नैमित्तीक कामगार कायम सेवेत- उपमुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नियुक्ती पत्र प्रदान

दि. ३०/११/२०२३ रोजी सहयाद्री अतिथी गृह येथे उपक्रमाच्या १२३ नैमित्तीक कामगारांना कायमस्वरूपी नियुक्ती पत्र प्रदान करण्याचा कार्यक्रम पार पाडला. या प्रसंगी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री माननीय देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते १० नैमित्तीक कामगारांना बेस्ट उपक्रमामध्ये कायमस्वरूपीची नियुक्ती पत्रे प्रतिनिधीक स्वरूपात देण्यात आली. सदर कार्यक्रमास मा. प्रसाद लाड, आमदार व प्रतोद विधानपरिषद, मा. गोपिचंद पडळकर, आमदार आणि बेस्ट उपक्रमाचे महाव्यवस्थापक माननीय श्री. विजय सिंघल (भा.प्र.से.) हे उपस्थित होते.

या प्रसंगी माननीय उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य श्री देवेंद्र फडणवीस यांनी असे प्रतिपादन केले कि ''प्रदिर्घ प्रतिक्षेनंतर या नैमित्तीक कामगारांना बेस्ट उपक्रमाच्या सेवेत कायम करण्यात आले, हि आनंदाची बाब आहे. सदर नियुक्ती आमदार प्रसाद लाड यांच्या प्रयत्नाने तसेच मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. श्री. इक्बाल सिंह चहल व बेस्ट उपक्रमाचे महाव्यवस्थापक श्री. विजय सिंघल यांच्या सकारात्मकतेमुळेच शक्य झाली. आज १२३ कामगारांना नियमित करण्यात आले असून उर्वरित कामगारांना देखील लवकरच न्याय देण्याचा आपण प्रयत्न करू''
















# बेस्ट उपक्रमाचे १२३ नैमित्तीक कामगार कायम सेवेत



















## कु. रसिका प्रभाकर पावसकर हिचे विशेष कौतुक व अभिनंदन

उपक्रमात कार्यरत असलेले श्री. प्रभाकर केशव पावसकर, उप अभियंता (इ.प.उ), परिचय क्र.२१३६११, इमारत पश्चिम उपनगरे विभाग, मालवणी आगार यांची जेष्ठ कन्या कु. रसिका प्रभाकर पावसकर हिने २०२३ या वर्षात चायना देशातील ZHENGZHOU UNIVERSITY मधुन "बॅचलर ऑफ आर्टस (चायना)" BA (CHINA) या पदवी परिक्षेत ८४.८२ % मार्कस मिळवून उत्तीर्ण झाली. तसेच चीनमधील चंगचौ महाविद्यालयात ''चायनीज भाषा इतर भाषिकांना शिकवणे" (Four Year Full Time Under-graduate Program Of TEACHING CHINESE TO SPEAKERS OF OTHER LANGUAGES from September 2019 to June 2023) या विषयातील पदवी ३० जून, २०२३ रोजी प्राप्त केली. त्याच वेळी महाविद्यालयाने तिला ''उत्कृष्ट परदेशी विद्यार्थीनी" हा बहुमान बहाल करुन गौरविण्यात आले. या चार वर्षाच्या डिग्री कोर्ससाठी २०१९ साली चंगचौ युनिव्हर्सिटीकडून स्कॉलरशिप देण्यात आली होती. HSK-6 ही चीनमध्ये महत्वाची समजली जाणारी स्पर्धा परिक्षा देखील रसिका चांगल्या मार्कांनी पास झाली आहे.

२०२० मध्ये कोरोना सुरु झाल्यावर रसिका भारतात परतली. या कोरोनाच्या काळात भारतीय संस्कृतीचे मापदंड असणारे पं. पु. साने गुरुजी यांच्या "शामची आई" या अजरामर पुस्तकाचे चीनी भाषेत अनुवाद करुन चीन देशाला भारतीय संस्कृतीची ओळख करुन दिली. या पुस्तकाचे प्रकाशन दि. २९-०१-२०२३ रोजी रविंद्र नाटयमंदिर, पु. ल.देशपांडे कला अकादमी येथे प्रमुख पाहुणे भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेचे माजी मानद सचिव प्रा. डॉ. श्रीकांत बहुलकर, चायानीज युपेपे, जेन यांच्या हस्ते करण्यात आले. या तिच्या कार्याची दखल पुढारी व लोकमत या वृत्तपत्रांनी घेऊन या विषयीचा अहवाल दि. २५-०१-२०२३ च्या अंकात प्रसिध्द केला आहे. रसिका ही "अनाम प्रेम" या सामाजिक संस्थेची कार्यकर्ती आहे.

कु. रसिका प्रभाकर पावसकर हिच्या या भव्यदिव्य कतृत्वाला मानाचा मुजरा. **'बेस्टवार्ता'**तर्फे तिचे विशेष कौतुक व अभिनंदन. तसेच तिच्या पुढील वाटचालीसाठी खुप खुप हार्दिक शुभेच्छा!



## आणिक आगारातील बसवाहक श्री.राजेश पोखरकर यांची मुलगी कु. तेजस्वी पोखरकर हिची 'ज्ञानविकास' च्या मुलींची खो-खो स्पर्धेत सुवर्ण कामगीरी

कोपरखैरणे येथील ज्ञानविकास स्पोर्टस फॉउंडेशनची खेळाडू तेजस्वी राजेश पोखरकर हिने २७ ते ३० डिसेंबर, २०२३ रोजी छत्तीसगड येथे झालेल्या १८ वर्षाखालील राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत मोलाची कामगीरी करून महाराष्ट्र संघाला सुवर्ण पदक मिळवून दिले. या अगोदर सुद्धा तेजस्वीने क्रिडा व युवक सेवा संचनालय, महाराष्ट्र राज्य सांगली स्पर्धा २०२२-२३, महर्षी दयानंद कॉलेज, परेल स्पर्धा २०२३ उल्हासनगर महानगरपालिका आयोजित जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धा २०२२-२३, त्यानंतर ३ ते १०मार्च, २०२३ रोजी चिपळूण येथे झालेली स्पर्धा, सन २०२३ सप्टेंबर मध्ये अंबरनाथ येथे झालेली मॅरोथॉन स्पर्धा अशा अनेक स्पर्धांमध्ये सहभाग घेतलेले आहेत.

**"बेस्ट वार्तातर्फे"** कु. तेजस्वीचे अभिनंदन व पुढील अशाच यशस्वी वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा.

## अभिमानास्पद कर्तृत्वाला मानाचा मुजरा



कु. शिवानी शंकर पाटील

उपक्रमाच्या आणिक आगारातील वैद्यकिय विभागात कार्यरत असलेले श्री. शंकर शामराव पाटील, पर्यवेक्षक (वै) यांची सुकन्या कुमारी शिवानी शंकर पाटील हिची इंडियन आर्मीमध्ये लेफ्टनंट पदावर निवड करण्यात आली आहे. "लेफ्टनंट" परीक्षेत देशात तिसऱ्या क्रमांकावर आलेल्या कु. शिवानी पाटील हिचा सर्व क्षेत्रातुन गौरव करण्यात येत आहे.

देशसेवेसाठी वाहून घेतलेल्या कु. शिवानीच्या या अभिमानास्पद व इतरांना प्रेरणा देणाऱ्या कर्तुत्वाला मानाचा मुजरा.

लेफ्टनंट कु. शिवानीचे

**"बेस्टवार्तातर्फे"** अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी लक्ष लक्ष

**हार्दिक शुभेच्छा**




## कु. सुशांत हिम्मतराव चव्हाण यांची क्रिडा क्षेत्रातील उत्तुंग कामगिरी

बेस्ट उपक्रमातील नियोजन विभाग, वडाळा आगार येथे कार्यरत असणारे बसचालक ०११७४४ श्री. हिम्मतराव ल. चव्हाण यांचा सुपूत्र श्री. सुशांत हे ठाणे शहर पोलीस दलातर्फे तेथील महाराष्ट्र पोलीस दल प्रशिक्षण केंद्रात भरविण्यात आलेल्या १०० मीटर २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त करुन सुवर्ण पदकाचे मानकरी ठरले.

कु. सुशांतच्या या अभूतपूर्व कामगिरीबद्दल 'बेस्टवार्ता' परिवारातर्फे मन:पूर्वक अभिनंदन व पुढील वाटचाली करीता त्याला हार्दिक शुभेच्छा.

# कविता

## सुन्न झाली भावना

एकटीच लढलीस एकाकी, घनघोर या अंधारी
माहित असून गळून पडायचे तरी फिरली नाहीस माघारी ।। १ ।।

तुझी जिद्द पाहून काळही गेला ओशाळून
मित्रच केलेस त्याला दुःख सारे जाळून ।। २ ।।

रोजचाच संघर्ष तुझा किती कुणाला सांगायचा
करपून गेलेल्या मनाला कुठून ओलावा आणायचा ।। ३ ।।

रात्र वैरी झाली तसा दिसही झाला
लेकरासाठी केवळ झुंझवलेस मरणाला ।। ४ ।।

तुझे सर्व गोठवलेले अश्रू कळणार का कोणाला
अखेर एकलाच चलो म्हणत गेलीस दूर देशाला ।। ५ ।।

आमची होतीस म्हणूनच हट्ट केला
परी धरुन अबोला का सोडलेस आम्हाला ।। ६ ।।

आता तुझी आठवण हिच एक साठवण
परत येशील कधी तरी हिच आशा मनोमन ।। ७ ।।

- श्री. अविनाश ह. पवार (सप्रव्य , सचिवीय विभाग) -

# संस्कृत भाषा आणि महत्व

संस्कृत हि एक ऐतिहासिक भाषा असून ती पृथ्वीवरील सर्वात प्राचीन, समृध्द आणि शास्त्रीय भाषा मानली जाते. संस्कृत भाषा ही हिंदी, मराठी, गुजराती, तमिळ इ. विविध भाषांची जननी आहे. संस्कृत भाषेला सुर भारती, देववाणी, देवीवाक, देवभाषा, अमरभारती, गीर्वाणवाणी इ. अन्य नावे आहेत. संस्कृतमध्ये लिहिलेले शिलालेख सर्वात प्राचीन आहेत. पण काही कालांतराने संस्कृत भाषेचे महत्व संपुष्टात आले व इ.स. १२०० नंतर संस्कृत भाषा प्रचलित झाली.

आपण ज्या भाषेला संस्कृत म्हणून ओळखतो त्यामधील सर्व प्राचीन वाङ्‌मय ऋग्वेदातील मंत्रात आढळते. या भाषेची ऐतिहासिक दृष्ट्या स्थुलमानाने तीन रुपे आढळतात. पहिले रुप वेदांच्या संहिता भागात दिसणारे, दुसरे उत्तर वैदिक म्हणजे ब्राम्हणे, आरण्यके व उपनिषद हे ग्रंथ व वेदांग वाङ्‌मयांत आढळणारे आणि तिसरे पाणिनी नंतरच्या ग्रंथातुन विशेषतः कालिदासादी कवींच्या काव्यात आढळणारे संस्कृत या भाषेला शास्त्रीय भाषा मानली जाते. ही भाषा हिंदु, बौध्द आणि जैन धर्माच्या उपासनेची भाषा असून ती भारताच्या २३ शासकीय राज्य भाषांपैकी एक आहे. नेपाळमध्ये या भाषेला अतिशय महत्व आहे.

संस्कृत ही एक वैज्ञानिक भाषा आहे. नासाने संस्कृतचा आपल्या प्रोग्रामिंग लॅंग्वेजसाठी वापर केला आहे. आजच्या कॉम्प्युटर युगात संस्कृतचे महत्व अधिक आहे. कॉम्प्युटरच्या बेसिक लॅंग्वेजची निर्मिती संस्कृत भाषेच्या सिध्दांतांवर करण्यात आली आहे. भारताबरोबर अनेक पाश्चात्य देशात संस्कृत भाषा शिकवली जाते. जगातील १७ देशांमध्ये तांत्रिक ज्ञानासाठी संस्कृतच्या अभ्यासासाठी विद्यापीठे आहेत. विशेषतः भारतीय श्री चक्रावर आधारित संरक्षण प्रणालीचा युकेमध्ये अभ्यास केला जात आहे.

संस्कृतच्या ध्वन्यात्मकतेचा शरीराच्या उर्जा बिंदूशी थेट संबंध असल्याचे आढळते. संस्कृत शब्दांचे वाचन किंवा उच्चार केल्याने शरीरातील बिंदू उत्तेजित होतात त्यामुळे संपूर्ण शरीराची उर्जा वाढते. रोगप्रतिकारक शक्ती वाढते, मन शांत होते, तणावापासून मुक्तता होते. संस्कृत ही एकमेव भाषा आहे जी भाषेतील सर्व मज्जातंतू शेवटचा वापर करते. शब्द उच्चारतांना सामान्य रक्त पुरवठा सुधारतो. परिणामी मेंदूचे कार्य सुधारते. अमेरिकन हिंदू युनिव्हर्सिटीच्या म्हणण्यानुसार याचा परिणाम एकंदर आरोग्यावर होतो. संस्कृतच्या अभ्यासामुळे मानसिक क्रियाकलाप आणि स्मरणशक्ती सुधारते. जे विद्यार्थी या भाषेवर प्रभुत्व मिळवतात त्यांना गणित आणि इतर विज्ञान अधिक चांगल्या प्रकारे समजू लागतात आणि त्यांना जास्त गुण मिळतात. लंडनमधील स्कूल ऑफ जेम्स ज्युनियरमध्ये आपल्या विद्यार्थ्यांसाठी संस्कृतचा अभ्यास अनिवार्य विषय म्हणून सुरु केला, त्यानंतर तेथील विद्यार्थी अधिक चांगल्या प्रकारे अभ्यास करताना आढळून आले. हेच अनुकरण

## ..... संस्कृत भाषा आणि महत्व .....

आयर्लंडमधील काही शाळांनी अनुसरले.

संस्कृत ही जगातील सर्वच भाषांची जननी आहे. संस्कृत भाषेला 'ज्ञानभाषा' असे हि म्हटले आहे. या भाषेचे महत्व आज पाश्चिमात्यांनाही समजले आहे. इंडोनेशियात हि भाषा लोकप्रिय आहे. जपानमध्ये या भाषेविषयी आकर्षण आहे. जर्मनी, अमेरिका येथेही या भाषेच्या अभ्यासकांची संख्या वाढत आहे. संस्कृत भाषेत जेवढी काव्य, नाटके आहेत त्यापेक्षा किती तरी अधिक प्रमाणात विविध शास्त्रांशी संबंधित ग्रंथसंपदा आहे. यासाठीच आज अनेक परदेशी विद्यापीठांमध्ये संस्कृतचा अभ्यास केला जातो.

संस्कृतमध्ये अनेक चांगली दर्जेदार सुभाषिते आहे. त्यातील काही वानगीदाखल येथे देत आहे.

१) अतिपरिचयातअवज्ञा संततगमनादनादरो भवति। मलये भिल्ल पुरन्ध्री चन्दनतरु-काष्ठमिन्धनं कुरुते।।

अर्थ - कुणाशीही अती जवळीक झाली किंवा कुणाकडंही सतत जात राहिलं तर जाणाऱ्याचा मान राखला जात नाही, त्याला किंमत दिली जात नाही. याचं सुंदर उदाहरण सुभाषितकार असं देतो की, जगात चंदनाच्या लाकडाला खूप मान आहे, त्यासाठी बरीच रक्कम मोजावी लागते; पण मलय पर्वतावर चंदनाची अगणित झाडं असल्यामुळे तिथं राहणाऱ्या भिल्ल स्त्रीला त्याची किंमत नाही, ती रोजच्या जळणासाठीसुद्धा चंदनाचं लाकूडच वापरते.

२) खद्योतो द्योतते तावद् यावन्नोदयते शशी ।
उदिते तु सहस्त्रांशौ न खद्योतो न चन्द्रमाः ।।

अर्थ : जोपर्यंत चंद्र उगवत नाही तोपर्यंतच काजव्याचा प्रकाश दिसतो; पण एकदा का सूर्य उगवला की काजवाही दिसत नाही अन् चंद्रही दिसत नाही.

३) चिंता चितासमा ह्युक्ता बिन्दुमात्रविशेषिता ।
सजीवं दहते चिन्ता, निर्जीवं दहते चिता।।

अर्थ : चिंता आणि चिता अगदी सारख्याच. फक्त एका टिंबाचाच काय तो फरक. दोघींचं कार्य एकच माणसाला जाळणं. चिता निर्जीव माणसाला एकदाच जाळते; पण चिंता मात्र जिवंत माणसाला मरेपर्यंत जाळत राहते.

४) शास्त्राण्यधीत्यापि भवन्ति मूर्खा यस्तु क्रियावान्पुरुषः स विद्वान् ।
सुचिन्तितं चौषधमातुराणां न नाममात्रेण
करोत्यरोगम् ।।

अर्थ : शास्त्रांचा खूप अभ्यास केलेली माणसंसुद्धा मूर्ख असू शकतात. तो अभ्यास जो कृतीत उतरवतो तोच खरा पंडित. कोणत्या रोगावर कोणतं औषध आहे हे जरी अचूक माहीत असलं तरी ते नुसतं घोकत राहून रोग बरा होत नाही.

## ..... संस्कृत भाषा आणि महत्व .....

ते औषध प्रत्यक्ष तयार करून किंवा आणून घेतलं तरच तो रोग हटेल.

५) वेषो न विश्वसेत्प्राज्ञो वेषो दोषाय जायते ।
रावणो भिक्षुरूपेण जहार जनकात्मजाम् ।।
अर्थ : शहाण्या माणसानं एखाद्याच्या कपड्या-लत्यावर किंवा वेशभूषेवर भाळून त्याच्यावर मुळीच विश्वास ठेवू नये. रावणान संन्याशाचा वेश धारण करूनच जनकाच्या कन्येला, सीतेला, पळवून नेलं होतं.

६) एकं वस्तु द्विधा कर्तुं बहवः सन्ति धन्विनः ।
धन्वी स मार एवैको द्वयोरेकं करोति यः ।।
अर्थ : एका वस्तूचे दोन भाग करण्यात पारंगत असणारे कित्येक धनुर्धर आहेत; पण दोन वस्तू जोडून एक करणारा मदन हा एकमेव धनुर्धारी आहे. (मदनाच्या बाणानं दोन प्रेमी जीवांची हृदयं एक होतात, असा कविसंकेत आहे).

७) षड्दोषा पुरुषेणेह हातव्या भूतिमिच्छता ।
निद्रा तन्द्रा भयम् क्रोध आलस्यं दीर्घसूत्रता ।।
अर्थ :
ज्याला आपला उत्कर्ष करून घ्यायचा असेल त्यानं (अती) झोप, तंद्री, भीती, राग, आळस आणि कामं लांबणीवर टाकणं हे सहा दोष टाळलेच पाहिजेत.

८) जाड्यं धियो हरति सिंचती वाचि सत्यं,
मानोन्नतिं दिशति पापमपाकरोति ।
चेतः प्रसादयति दिक्षु तनोति कीर्तिं,
सत्संगती: कथय कीं न करोति पुंसाम् ।।
अर्थ : सत्संगती बुद्धीचे जडत्व नष्ट करते, वाणी मध्ये सत्याचे सिंचन करते, सन्मान वाढवते, पाप नष्ट करते, चित्त प्रसन्न ठेवते, दहा दिशांत कीर्ति पसरवते. सत्संगती मनुष्याचे काय चांगले करत नाही सांगा.

- राजेश खानोलकर - पर्यवेक्षक,
जनता संपर्क विभाग, कुलाबा

# कॉमनवेल्थ मास्टर्स टेबल टेनिस चॅम्पियनशिप २०२३-२४ स्पर्धेत श्रावणी ढापरे यांना तिहेरी यश



कॉमनवेल्थ मास्टर्स स्पर्धा २०२३-२४ पहिल्यांदा भारतात हैदराबाद येथे पार पडली. हि स्पर्धा आंतरराष्ट्रीय टेबल टेनिस महासंघ (ITTF) आणि कॉमनवेल्थ टेबल टेनिस महासंघ (CTTF) यांनी १८ ते २१ नोव्हेंबर २०२३ रोजी फायरफॉक्स स्पोर्टस आणि रीमोर्टस येथे आयोजित केली होती. या स्पर्धेत भारतातर्फे खेळत सौ. श्रावणी दुर्गेश ढापरे, वरिष्ठ लघुलेखिका (वै), उप. मु. अभियंता-ग्रा. से. (उत्तर) यांनी सुवर्ण रौप्य तसेच कांस्य पदके मिळवून घवघवीत यश प्राप्त केले. श्रावणी ढापरे यांचे **'बेस्टवार्ता'** तर्फे अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी खूप खूप हार्दिक शुभेच्छा.

# ऑल इंडिया पब्लिक ट्रान्सपोर्ट टूर्नामेंट - २०२३

ऑल इंडिया पब्लिक ट्रान्सपोर्ट टूर्नामेंट - २०२३ (मेन्स आणि वुमेन) स्पर्धा बडोदरा, गुजरात येथे. गुजरात स्टेट रोड ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन (जीएसआरटीसी) ने दिनांक २१-०९-२०२३ ते २३-०९-२०२३ दरम्यान आयोजित केली होती. या स्पर्धेमध्ये एकूण १० राज्यातील वाहतुक कंपन्यांनी भाग घेतला होता. सदर स्पर्धेत सर्वश्री सचिन भारती, दिपक दमानिया, दिनेश पांडे, हेमंत आरोलकर, सुदास सावंत तसेच सौ. सायली परब, संगीता जाधव व श्रावणी ढापरे यांनी भाग घेतला होता. सदर स्पर्धेचा अहवाल खालीलप्रमाणे :

| अनु. | स्पर्धेचा प्रकार | स्पर्धकाचे नाव | निकाल |
|---|---|---|---|
| १ | पुरुष एकेरी | सचिन भारती | विजेता |
| २ | महिला एकेरी | सायली परब<br>श्रावणी ढापरे | विजेती<br>उपविजेती |
| ३ | पुरुष दुहेरी | हेमंत आरोलकर व दिनेश पांडे | उपविजेता |
| ४ | महिला दुहेरी | सायली परब व संगीता जाधव | विजेती |
| ५ | पुरुष संघ चॅम्पियनशीप | सचिन भारती, दिपक दमानिया, दिनेश पांडे, हेमंत आरोलकर, सुदास सावंत. | विजेता |
| ६ | महिला संघ चॅम्पियनशीप | सायली परब, संगीता जाधव, श्रावणी ढापरे | विजेती |

## ASRTU Sports Meet - 2023 (गुजरात)

### उल्लेखनीय कामगिरी बेस्ट बॅडमिंटन संघ

दिनेश पांडे । दिपक दमानिया । सायली परब-(मानद सचिव) । संगिता जाधव । श्रावणी ढापरे । हेमंत आरोलकर । सुदास सावंत । नंदकिशोर तावडे-(व्यवस्थापक) । सचिन भारती (कर्णधार).



# सांस्कृतिक कार्य संचालनालय आयोजित

# ६२ वी महाराष्ट्र राज्य मराठी प्राथमिक फेरी नाट्य स्पर्धा

# २०२३-२४,

## द्वितीय क्रमांक नाटक

# “मॅकबेथ“




पारितोषिक स्विकारताना बेस्टचे कलाकार

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# सांस्कृतिक कार्य संचालनालय

## महाराष्ट्र राज्य नाट्य महोत्सव

सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे २०२३-२४ मध्ये आयोजित

६२ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेत (प्राथमिक फेरी)

**बेस्ट कला आणि क्रीडा मंडळ, मुंबई**

या संस्थेने सादर केलेल्या

**मॅकबेथ** या नाटकासाठी

यांना

**सर्वोत्कृष्ट नाट्यनिर्मिती द्वितीय** करिता

पारितोषिक मिळाल्याबद्दल हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

(सुधीर मुनगंटीवार)
मंत्री, सांस्कृतिक कार्य

(विकास खारगे)
प्रधान सचिव,
सांस्कृतिक कार्य विभाग

(बिभीषण चवरे)
संचालक,
सांस्कृतिक कार्य संचालनालय

# आणिक आगारातील वस्तुसंग्रहालयाचे उद्घाटन करताना सुप्रसिध्द सिनेतारका वर्षा उसगांवकर यांच्या समवेत टिपलेली क्षणचित्रे


















# रविंद्र नाटय मंदिरात रंगला बेस्ट दिन सोहळा – २०२३



















## ..... रविंद्र नाटय मंदिरात रंगला बेस्ट दिन सोहळा – २०२३ .....



















## ..... रविंद्र नाटय मंदिरात रंगला बेस्ट दिन सोहळा – २०२३ .....

















..... रविंद्र नाट्य मंदिरात रंगला बेस्ट दिन सोहळा – २०२३ .....
















# कुलाबा सभागृहात दिनांक ९ ऑगस्ट २०२३ रोजी “मेरी मिट्टी मेरा देश” शपथ ग्रहण करताना बेस्टचे अधिकारी व कर्मचारी वर्ग









## १५ सप्टेंबर, अभियंता दिन (इंजिनियर्स डे)

भारतात दरवर्षी १५ सप्टेंबर हा दिवस सर्व ठिकाणी अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो. अभियंता दिन किंवा अभियांत्रिकी दिवस १५ सप्टेंबरलाच का साजरा केला जातो? यामागे एक कारण आहे; सर एम. विश्वकर्मा, पूर्ण नाव - मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या ज्यांना 'सर' ही पदवी देण्यात आली होती. भारतातील ते महान अभियंते ज्यांना भारतरत्न देण्यात आला. त्यांचा जन्म १५ सप्टेंबर, १८६१ रोजी कर्नाटकात झाला. त्यांना अभियांत्रिकेचे जनक देखील म्हटले जाते. सर एम. विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय अभियांत्रिकी दिवस साजरा करण्यात येतो. सर एम. विश्वेश्वरय्या हे भारतीय अभियांत्रिकी क्षेत्रातील त्यांच्या अभूतपूर्व कामगिरी आणि योगदानासाठी ओळखले जातात. ते एक नामांकित सिव्हिल इंजिनियर, विद्वान आणि राजकारणी होते ज्यांनी भारताच्या विकासात महत्वपूर्ण भूमिका बजावली.

कावेरी नदीवर बांधलेले कृष्णा राजा सागर धरण (केआरएस) हे एम. विश्वेश्वरय्या यांच्या प्रसिद्ध योगदानापैकी एक आहे. हे धरण त्या काळातील सर्वात मोठ्या जलाशयांपैकी एक होते. या धरणाने दक्षिण भारताच्या विकासात मोठी भूमिका बजावली. हा प्रकल्प आजही परिसरातील शेती आणि पाणीपुरवण्यासाठी महत्वाचा आहे. याशिवाय त्यांनी सिंचन आणि पुरनियंत्रण क्षेत्रातही मोलाची कामगिरी केली. त्यांनी अनेक धरणे, पूल आणि पाणी वितरण प्रकल्पांची रचना केली, ज्यामुळे भारतातील कृषी आणि औद्योगिक विकासाला गती मिळाली.

मुंबईच्या बंदर परिसरात पुराचा सामना करण्यासाठी त्यांनी ड्रेनेज सिस्टमची रचना केली. देशात तंत्र शिक्षणाचा प्रसार करण्यातही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. तथापि अभियंता दिवस केवळ सर. एम. विश्वेश्वरय्या यांच्या योगदानाला श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी साजरा केला जात नाही, तर देशाच्या प्रगतीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या सर्व अभियंत्यांचा सन्मान करण्याचा हा दिवस आहे.

दरवर्षी १५ सप्टेंबरला अभियंता दिन (इंजिनियर्स डे) का साजरा करावा ? तर अभियंता दिनाचे उद्दिष्ट विद्यार्थी आणि तरुणांना विज्ञान, तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकीमध्ये करिअर करण्यासाठी प्रेरित करणे हा आहे. अभियंता दिवस आपल्याला तांत्रिक नवकल्पना आणि अभियांत्रिकीच्या मदतीने आपण आगामी आव्हाने कशी सोडवू शकतो याची आठवण करून देतो. अभियंता दिवस जगभरातील विविध देशांमध्ये वेगवेगळ्या तारखांना साजरा केला जातो. युनेस्कोने घोषित केलेला जागतिक अभियांत्रिकी दिवस ४ मार्च रोजी साजरा केला जातो. भारतातील अभियांत्रिकी दिनाचा इतिहास सुमारे ५६ वर्षांचा आहे. १९६८ मध्ये प्रथमच अभियंता दिन साजरा करण्यात आला. १९६२ मध्ये सर एम विश्वेश्वरय्या यांच्या निधनानंतर त्यांचा वारसा पुढे नेण्यासाठी आणि त्यांच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी १५ सप्टेंबर हा अभियंता दिवस (इंजिनियर्स डे) म्हणून घोषित करण्यात आला.

**राजेश खानोलकर : पर्यवेक्षक, जनता संपर्क विभाग, कुलाबा**

## यशवंतराव चव्हाण सभागृहात मा. श्री. विजय सिंघल, महाव्यवस्थापक यांच्या अध्यक्षतेखाली दि. १५ सप्टेंबर रोजी "अभियंता दिवस-२०२३ (इंजिनियर्स डे-२०२३)" उत्साहात साजरा करताना बेस्ट उपक्रमातील अभियंता वर्ग





















ENGINEER'S
DAY 2023
Hon.Shri.Vijay Singhal IAS


DAY 2023
CELEBRATION OF CREATION
Address by


बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका)
ENGINEER'S
DAY 2023




ENGINEER'S
DAY 2023


CELEBRATION OF CREATION
Hon.Shri.Vijay Singhal IAS


VVIP



# बेस्ट उपक्रमातर्फे सार्वजनिक गणेशोत्सव २०२३ गणेश भक्तांकरिता केलेली व्यवस्थाः

दरवर्षीप्रमाणे गणेश भक्तांसाठी बस वाहतुक व्यवस्था बेस्टच्या वाहतुक विभागाकडून करण्यात आली. बेस्टच्या विद्युत पुरवठा विभागाकडून सार्वजनिक गणेशोत्सवासाठी मिरवणूक मार्ग, विसर्जन स्थळे याठिकाणी बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिलेल्या कार्यादेशानुसार प्रकाश योजना करण्यात आली. मुंबई शहरात गणेश भक्तांसाठी ७१ मिरवणूक मार्ग, २० विसर्जन स्थळे आणि ३९ कृत्रिम तलाव येथे २२९६ दिवे लावण्याची प्रकाश योजना करण्यात आली. विसर्जन स्थळांवर सुयोग्य प्रकाशव्यवस्थेकरिता एकूण १५ स्थायी विद्युत मनोऱ्यांची उभारणी करण्यात आली. तसेच मोठ्या गर्दीच्या ठिकाणी आपत्कालीन परिस्थितीत विद्युतपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी विसर्जन स्थळांवर पर्यायी वीजपुरवठयाकरिता एकूण ८ डिझेल जनित्र संचाची व्यवस्था केली. आपत्कालीन प्रसंगी समुद्रात बुडणाऱ्यांना वाचविण्यासाठी जीवरक्षक दलास मदत म्हणून एकूण १९ उच्च क्षमतेचे झोत असलेले शोधप्रकाश (सर्चलाईट) दिव्यांची व्यवस्था करण्यात आली. विसर्जन स्थळांवरील वीज पुरवठा सुरळीत व अखंडपणे चालू ठेवण्यासाठी विशेष अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पथक नेमण्यात आले.

## ..... दरम्यान टिपलेली काही क्षणचित्रे.....


















## प्रशासक तथा महाव्यवस्थापक बेस्ट यांना अर्थसंकल्प २०२४-२५ चे सादरीकरण करताना





# अध्यात्म म्हणजे काय ?

- अध्यात्म म्हणजे मुळात कोणतीही धार्मिक गोष्ट नाही.
- अध्यात्म म्हणजे  वरिष्ठांच्या प्रती आदरभाव असणे.
- अध्यात्म म्हणजे कनिष्ठांच्या प्रती करुणाभाव बाळगणे.
- अध्यात्म म्हणजे आपल्यामुळे कोणाला त्रास होऊ नये असं वागणं.
- अध्यात्म म्हणजे वेद वाचण्यापेक्षा वेदना वाचता येणे.
- अध्यात्म म्हणजे आपलं काम प्रमाणिकपणे करणं.
- अध्यात्म म्हणजे आपलं कौटुंबिक आणि सामाजिक कर्तव्य पार पाडणं.
- अध्यात्म म्हणजे मुक्या प्राण्यांवर, पशु-पक्ष्यांवर प्रेम करणे
- अध्यात्म म्हणजे निरपेक्ष सत्कर्म करत राहणे.
- अध्यात्म म्हणजे नि :स्वार्थी सेवाभाव जोपासणे.
- अध्यात्म म्हणजे सदैव कृतार्थ भाव अंगी बाळगणे.
- अध्यात्म म्हणजे विना अपेक्षा कौतुक करणे
- अध्यात्म म्हणजे आपण प्रत्येकाशी सद्‌भावाने राहणे.
- अध्यात्म म्हणजे ग्रंथांच्या आणि संतांच्या संगतीत सदैव असणे.
- अध्यात्म म्हणजे या समाजाचे काही देणं लागतो आणि ते आपण दिलेच पाहिजे अशी मानसिकता मनाशी सतत बाळगणे.
- अध्यात्म म्हणजे गरजवंताना यथाशक्ती आर्थिक किंवा शाब्दिक मदत करणे.
- अध्यात्म म्हणजे आपल्या बरोबर इतरांची देखील प्रगती होवो हा भाव अंगी असणे.
- अध्यात्म म्हणजे साधं सोपं सरळ आणि निर्मळ असणं-दिसणं आणि वागणं.
- अध्यात्म म्हणजे फक्त पूजा, पाठ, प्रार्थना आणि भक्ती नव्हे तर आपण केलेली पूजा, पाठ, प्रार्थना आणि भक्ती या प्रमाणे आपली केलेली कृती असणे.
- अध्यात्म म्हणजे राष्ट्रपुरुष आणि राष्ट्रीय संताचं सदैव स्मरण असणे.
- थोडक्यात अध्यात्म म्हणजे सकाळ पासून रात्री झोपेपर्यंत नित्य कर्म, कर्तव्य पारदर्शक पद्धतीने पार पाडणे.

“शुभम भवतु”

- संकलन -
राजेश खानोलकर, पर्यवेक्षक,
जनता संपर्क विभाग, कुलाबा

# दसरा रंगावली स्पर्धा उद्घाटन सोहळा
















# दसरा रंगावली स्पर्धा-2023

## महिला गट




*प्रथम क्रमांक - भारती कांबळी*
*(मिसाईल वुमन डॉ. टेसी थॉमस)*





*द्वितीय क्रमांक - भारती धामणकर - (गर्जा महाराष्ट्र)*




*तृतिय क्रमांक - अश्विनी म्हात्रे - (वसुधैव कुटुम्बकम)*

## पुरुष गट



*प्रथम क्रमांक - महेंद्र शेंद्रे*



*द्वितीय क्रमांक - विशाल चव्हाण*




*तृतिय क्रमांक - प्रशांत मयेकर*

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त बेस्ट उपक्रमातर्फे शिवाजी पार्क, दादर येथे उपस्थित जनसमुदायांकरिता पुरविण्यात आलेल्या विविध सेवा सुविधा

बेस्ट उपक्रमातर्फे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दिनांक ५ व ६ डिसेंबर २०२३ रोजी दरवर्षीप्रमाणे विविध प्रकारच्या सेवा सुविधा पुरविण्यात आल्या.

**अ) विद्युत पुरवठा विभागातर्फे:**

- शिवाजी पार्क, चैत्यभूमी, दादर चौपाटी, राजगृह, दादासाहेब फाळके मार्ग, आंबेडकर महाविद्यालय, वडाळा आणि मादाम कामा मार्ग इ. ठिकाणी अतिरिक्त १५० वॅटचे ४२७ एलईडी मार्गप्रकाश दिवे व २००० वॅटचे चार मेटल हलाईड अतिरिक्त मार्गप्रकाश दिवे बसविण्यात आले.
- बाजीप्रभू उद्यान, ज्ञानेश्वर उद्यान, आणि महापौर बंगला या ठिकाणी ६ किलो वॅटचे ३ शोधप्रकाश दिवे विशेष मनोऱ्यांवर बसविण्यात आले.
- मार्गप्रकाश दिव्यांचा विद्युत पुरवठा अखंडीत ठेवण्यासाठी ६२.५ केव्हीए दोन जनरेटर शिवाजी पार्क आणि सुर्यवंशी हॉल येथे ठेवण्यात आले.
- एरियल लिफ्ट व त्यावरील कर्मचारी आणि व्हीएचएफ हे २४ तास तैनात ठेवण्यात आले होते.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनासंबंधीची माहिती जाहिरातीच्या माध्यमांतून दाखविणारे किऑक्स चैत्यभूमी येथील विविध ठिकाणी मार्गप्रकाश स्तंभावर लावण्यात आले.
- उच्च दाब दोष निवारण अभियंत्यांचे राखीव पथक कॅडल रोड, वितरण केंद्र येथे तैनात करण्यात आले.
- लघु दाब दोष निवारणाकरिता अभि-यंत्यांचे राखीव पथक नाना-नानी पार्क येथे तैनात करण्यात आले.
- व्ही.एस.एन.एल आणि माहिम संग्राही केंद्रातील कर्मचाऱ्यांचे राखीव पथक तैनात करण्यात आले.
- चैत्यभूमी येथे वितळतार नियंत्रण राखीव पथक तैनात करण्यात आले होते.
- २५० के.व्ही.ए. आणि ५०० के.व्ही.ए. चे डिझेल जनरेटर व त्यासाठी लागणारे कर्मचारी यांचे राखीव पथक कॅडल रोड व ओम अपार्टमेंट वितरण उपकेंद्र येथे तैनात ठेवण्यात आले.
- जवळच्या संधारणेपासून गरज पडल्यास वरून तात्पुरता वीज पुरवठा उपलब्ध करून देण्याची व्यवस्था देखील करण्यात आली होती.
- याव्यतिरिक्त चैत्यभूमी व शिवाजी पार्क मैदान परिसरात महानगरपालिकेने परवानगी दिलेल्या विविध संस्थांच्या मंडप / तंबूंना तात्पुरता वीजपुरवठा महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने मंजूर केलेल्या वीज दरानुसार करण्यात आला.

**ब) वाहतूक विभागातर्फे:**

- दादर रेल्वे स्थानक येथून चैत्यभूमीकरिता दिनांक ५

ते ७ डिसेंबर पर्यंत दररोज १५/२० मिनिटांच्या प्रस्थानांतराने बससेवा उपलब्ध करून देण्यात आल्या.

- दिनांक ५ डिसेंबर २०२३ रोजी रात्रौ मुंबईच्या विविध भागांमधून चैत्यभूमीसाठी बसमार्ग क्र. २००,२४१, ए-३५१, ३५४ वर बससेवा प्रवर्तित करण्यात आल्या.
- दि. ६ डिसेंबर, २०२३ रोजी छत्रपती शिवाजी महाराज उद्यान, दादर येथून प्रवर्तित होणाऱ्या बसमार्ग क्र. २४१, , ३५४, ए-१६४, ए-३५१, ए-३५७, ए-३८५, सी-३३, , सी-३०५, सी-४४०, सी-५२१ या बसमार्गांवर अतिरिक्त बसगाड्यांचे प्रवर्तन करण्यात आले, जेणेकरून नियमित प्रवासभाड्यात प्रवाशांना चैत्यभूमि येथे पोहचणे सहजसाध्य झाले.
- महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी येथे येणाऱ्या प्रवाशांच्या सोयीकरिता तात्पुरत्या स्वरूपात दैनंदिन बसपास (रु.५०/- शुल्क) उपलब्ध करून देण्यात आला.
- सदर विविध सुविधा उपलब्ध करण्याकरिता तसेच अनुयायांच्या मार्गदर्शनासाठी चैत्यभूमी, छत्रपती शिवाजी महाराज उद्यान, वीर हुतात्मा भाई कोतवाल उद्यान (प्लाझा) परिसरामध्ये बस वाहक /बस निरीक्षक यांची नियुक्ती करण्यात आली.
- छत्रपती शिवाजी महाराज उद्यान येथे बेस्ट उपक्रमातर्फे पेंडाल (Pendal) उभारण्यात आले व या पेंडाल मधून अनुयायांच्या माहितीकरिता पीए सिस्टीम (PA System) च्या माध्यमातून उद्घोषणा करण्यात येत होत्या. यामधून बेस्ट उपक्रमाने उपलब्ध करून दिलेल्या बससेवे बाबतची माहिती प्रामुख्याने अनुयायांना देण्यात येत होती.

### (क) वैद्यकीय विभागातर्फे:

- अनुयायांकरिता मोफत वैद्यकीय तपासणी औषधोपचार आणि प्रथमोपचाराची व्यवस्था करून देण्यात आली. त्यासाठी वैद्यकीय विभागाचे डॉक्टर्स, मिश्रक व वैद्यकीय परिचर यांचे पथक तैनात ठेवण्यात आले.
- बेस्ट उपक्रमाचा वैद्यकीय विभाग व के. बी. हाजी बच्चुअल नेत्र रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने शिबिरांतर्गत मोफत नेत्र तपासणी तसेच मोफत चष्मे वाटपाचे आयोजन करण्यात आले.
- वैद्यकीय विभागातर्फे क्षयरोग, एडस् / एच. आय. व्ही. विरोधी जनजागृती मोहिम राबविण्यात आली. तसेच डासांपासून होणाऱ्या मलेरिया, डेंग्यू, चिकन गुनिया या साथीच्या रोगांबद्दल (IEC) च्या माहिती पत्रकाव्दारे जनजागृती करण्यात आली.
- तंबाखु सेवनामुळे होणाऱ्या दुर्धर रोगांबद्दल जनजागृती तसेच तंबाखु व्यसनमुक्तीसाठी समुपदेशन व मॅजिक मिक्सबद्दल माहिती देण्यात आली.

### (ड) कल्याण विभागातर्फे:

- अल्पोपहार (बटाटा वडा, समोसा, चिवडा, कचोरी, भाकरवडी, पार्ले-जी बिस्किट, चहा व पिण्याचे पाणी) व्यवस्था करण्यात आली.
- मोफत नेत्र तपासणी व मोफत चष्मा वाटप शिबीराचे आयोजन करण्यात आले.
- मोफत औषधोपचाराची व्यवस्था करण्यात आली.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनचरित्रावरील पुस्तकांचे मोफत वाटप करण्यात आले.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन २०२३ बेस्टचे अभिवादन














उद्घाटक
मा. श्री. विजय सिंघल, भा.प्र.से.
बेस्ट एस.सी./एस.टी./व्ही.जे./एन.टी./एस.बी.सी. एम्प्लॉईज वेल्फेअर असोसिएशन








बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम


बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका)
संस्थांच्या तात्पुरत्या तंबूना सवलतीच्या दराने वीज पुरवठा देण्याकरीता एक खिडकी व्यवस्था करण्यात आली आहे
दि. ०४.१२.२०२३ ते ०६.१२.२०२३ पासून
विशेष व्यवस्था
संपर्क : शिवाजी पार्क मैदान, नाना नानी पार्क व बाल उद्यान शेजारी
वेळ : सकाळी १० ते संध्याकाळी ६ पर्यंत
मो. नं. ८६६७०२४२३७

# उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण

सर्वज्ञ (८५.१७ %)



प्रसाद सावंत
(वरिष्ठ लघुलेखक (वै), विद्युत पुरवठा कार्यालय, कुलाबा)

# पदवी परीक्षा उत्तीर्ण

श्रेया
(बी.एम.एस. फायनान्स)



दिपा वरळीकर
(पर्यवेक्षक (वै) वाहतुक, वरळी)

रत्नश्री
(बी.एम.एस.)



राजेश लोखंडे
(कार्यदेशक परि. अभियांत्रिकी, कुलाबा)

साईराज
(रोबोटिक्स ॲण्ड मेकॅट्रॉनिक्स)



रमेश पिसाळ
(जेष्ठ बसचालक, वाहतूक, विक्रोळी)

योगेश
(एफएमजीई)



पोपट पाटील
(पर्यवेक्षक (वै) ग्राहकसेवा फ वडाळा)

# पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण

निधी
एम.एस.सी.
(मास्टर ऑफ सायन्स बायोटेक्नॉलॉजी)



सचिन पुरव
(सहाय्यक प्रशासकीय अधिकारी, विदयुत पुरवठा,कुलाबा)

संध्या पुरव
(पर्यवेक्षक (वै), सामग्री व्यवस्थापन, कुलाबा)

निखिल
(मास्टर इन युरोपियन फ्रेशरेन्स ॲण्ड कॉस्मेटीक्स-इसिप्का फ्रान्स)



कुंदन चांदोरकर
(पर्यवेक्षक (वै), ग्राहक सेवा सिम्हा, वडाळा)

मोहक
(एम.एस.सी)



प्रसन्न वर्तक
(जेष्ठ कातारी, संयत्र परिरक्षा विभाग, दादर कार्यशाळा)

# पदविका परीक्षा उत्तीर्ण

**सोनल**
(चार्टर्ड अकाऊंटंट)



**संतोष अनंत शिंदे**
(दुय्यम अभियंता (वै) ग्राहकसेवा 'अ' विभाग)

**आदिती**
(बी.एच.एम.एस.)



**सूर्यकांत नि. राऊळ**
(पर्यवेक्षक (वै) कोष विभाग, कुलाबा

---

**तन्मय**
(एम.बी.ए.-ऑपरेशन्स अण्ड सप्लाय चैन मॅनेजमेंट)



**प्रकाश विठ्ठल केकान**
(महाकार्यदेशक, परिवहन अभियांत्रिकी, मुलूंड)

**सुमित**
(स्थापत्य अभियंता पदविका)



**प्रदिप रा. सोनवणे**
(अधिक्षक- मार्गप्रकाश (बांधणी), शिवडी

---

**पुर्वा**
(बी.एस.सी.-आयटी)



**प्रकाश विठ्ठल केकान**
(महाकार्यदेशक, परिवहन अभियांत्रिकी, मुलूंड)

**अनुजा**
(बी.ई.-आयटी)



**सुनिल बाबुराव भोसले**
(बसचालक, वरळी आगार)

## (१) वृत्तमानस - ३१/०८/२३

### बेस्ट कर्मचाऱ्याच्या सुपुत्राला आंतरराष्ट्रीय टेबल टेनिसमध्ये सुवर्णपदक

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई शहर वडाळा येथील पार्थ विनोद मगर यांने जॉर्डन येथे झालेल्या जागतिक नामांकन टेबल टेनिस स्पर्धेत सुवर्णपदक पटकावत दैदिप्यमान कामगिरी केली. पार्थ हा सातारा जिल्ह्यातील असुन ऑलम्पिकमध्ये चमकलेली ललिता बाबर व उपमहाराष्ट्र केसरी पैलवान किरण भगत आदींनी



क्रीडा क्षेत्रात माणचा (सातारा )लौकिक देशात नव्हे तर जगात वाढविला आहे. त्यांच्याच पावलांवर पाऊल टाकत पार्थने टेबल टेनिस या खेळात जबरदस्त कामगिरी केली आहे.

बेस्ट मध्ये विद्युत विभागात शिवडी डेपोत काम करत असलेले कर्मचारी विनोद मगर यांचा मुलगा असलेला पार्थ हा सध्या ठाणे येथील एसीई टेबल टेनिस अकॅडमीमध्ये आकाश कासार यांच्या मार्गदर्शनखाली सराव करीत आहे. त्याला रोहित तळवलकर आणि साकेत खेतान यांची मोलाची साथ लाभली आहे.

२२ ऑगस्ट ते २५ ऑगस्ट दरम्यान जॉर्डन देशात आंतरराष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत अठरा देशांनी सहभाग घेतला होता. यामध्ये पार्थ मगर याने पंधरा वर्षाखालील वैयक्तिक प्रकारामध्ये कास्य पदक जिंकले. तर पंधरा वर्षाखालीत दुहेरीमध्ये कु.दिव्यांशी भौमिक सोबत खेळताना अप्रतिम कामगिरी करत सुवर्णपदक जिंकले. तसेच सतरा वर्षाखालील गटात उपांत्यपूर्व फेरीपर्यंत मजल मारली.पार्थ याच्या यशाबद्दल त्याचे वडाला बेस्ट कामगार वसाहत तसेच , बेस्ट कला आणि क्रीडा मंडळ, मुंबईकर मंडळी व मलवडी ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

वृत्तमानस ३१/८/२०२३

## (२) प्रहार ०३/१०/२०२३

प्रहार ३/१०/२३

### बेस्ट वाहकाचा प्रामाणिकपणा

**मुंबई (प्रतिनिधी) :** घाटकोपर येथे बस आगारात जाताना बस वाहक यांना बसमध्ये सोमवारी एक हॅन्ड बॅग सापडली. ती त्यांनी बस आगारात जमा केली असता त्यात एक लाख तीस हजार रुपयांची रोख रक्कम आढळली. हे पैसे प्रामाणिकपणे जमा केल्याने बस वाहक गोकुळ राठोड यांच्यावर कौतुकाचा वर्षाव करण्यात येत आहे .



टाटा वीज केंद्र चेंबूर ते घाटकोपर आगार दरम्यान धावणाऱ्या बस क्रमांक ३८१ मार्गावर कामगिरी संपवून रात्री १० वाजता बस आगारात जात असताना बस वाहक गोकुळ राठोड यांना एक हॅन्ड बॅग सापडली. ती त्यांनी आगारात अधिकाऱ्यांकडे जमा केली. त्या बॅगेमध्ये एक लाख तीस हजार रुपयांची कॅश आढळली. बेस्ट वाहकाच्या या प्रामाणिकपणाचे कौतुक होत आहे.

## (३) महाराष्ट्र टाईम्स ९/१०/२०२३

महाराष्ट्र ९/१०/२०२३

### धावत्या बसमध्ये चालक बेशुद्ध झाल्याने गोंधळ

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

**वाहकाच्या प्रसंगावधानामुळे प्रवाशांचे वाचले प्राण**

बेस्टच्या धावत्या बसमध्ये चालकाची प्रकृती अचानक बिघडून तो बेशुद्ध झाला आणि सर्व प्रवाशांच्या काळजाचा ठोका चुकला. चालकाची स्थिती गंभीर होतीच, त्याचबरोबर बसमधील प्रवाशांचे प्राणही कंठाशी आले होते. मात्र वाहकाने प्रसंगावधान दाखवत हॅण्ड ब्रेक लावला आणि बस थांबवली. वाहकामुळे मोठा अपघात टळला आणि बसमधील सुमारे ३५ प्रवाशांचे प्राण वाचले.

मालाड परिसरातून शनिवारी रात्री बेस्टची बस जात होती. पुष्पा पार्क येथे वाहन चालवत असताना चालक अचानक बेशुद्ध पडला. स्टिअरिंग हातातून सुटल्याने बसवरील नियंत्रण सुटले. हा प्रकार लक्षात येताच वाहक पुढे धावत गेला आणि त्याने तत्काळ हँडब्रेक लावला. यामुळे बस थोडी पुढे जाऊन थांबली. बसमध्ये ३५ प्रवासी होते. वाहकाच्या प्रसंगावधानमुळे हे प्रवासी बचावले. चालकाची प्रकृती स्थिर असल्याचे बेस्ट प्रशासनाने म्हटले आहे.

## (४) सकाळ ९/१०/२०२३

सकाळ ९/१०/२०२३

### बेस्ट बसच्या चालकाला भोवळ

मुंबई, ता. ८ : भोवळ आल्याने 'बेस्ट' बसचालक आसनावरून खाली पडल्याची घटना शनिवारी (ता. ७) रात्री घडली. वाहक लहानू गोपाळा नागरे यांनी प्रसंगावधान राखत हॅण्ड ब्रेक लावल्याने गाडी थांबली व संभाव्य अपघात टळला.

दिंडोशी आगारातील बेस्ट बस (क्र. ५४३४) डाऊन मार्गावर पुष्पा पार्कमध्ये शनिवारी रात्री पावणेअकरा वाजता आली. त्या वेळी चालकाला अचानक भोवळ आली व तो आसनावरून खाली कोसळला. तातडीने वाहक नागरे यांनी बसचा हॅण्ड ब्रेक लावला. त्यामुळे बस जागेवरच थांबली व अपघात टळला. बसमध्ये ३० ते ३५ प्रवासी प्रवास करत होते. बसचालकाची प्रकृती सुधारत असल्याचे बेस्ट प्रशासनाकडून सांगण्यात आले.

## (५) लोकसत्ता ९/१०/२०२३

### 'बेस्ट' बस वाहकाच्या प्रसंगावधानामुळे अपघात टळला

**मुंबई :** बेस्ट उपक्रमातील बसचा संभाव्य अपघात बेस्ट वाहकाच्या प्रसंगावधानामुळे टळला. मालाड पूर्व परिसरातून शनिवारी रात्री बेस्ट बस जात असताना चालकाला अचानक चक्कर आली आणि ते आसनावरून केबिनमध्ये पडले. बसमधील वाहक लहानू नागरे यांनी प्रसंगावधान राखून हॅण्ड ब्रेक लावून बस गाडी थांबवली. त्यामुळे अपघात टळला. चालकाची प्रकृती स्थिर झाली, असे बेस्ट उपक्रमातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

### 'बेस्ट'मध्ये प्रवाशाचा मृत्यू

**मुंबई :** बेस्ट उपक्रमाच्या बसमध्ये एका ७० वर्षीय प्रवाशाला रविवारी सायंकाळी ५.४५ वाजता अचानक चक्कर आली. यावेळी वाहकाने प्रथमोपचार करून त्याला रुग्णालयात दाखल केले होते. डॉक्टरांनी त्याला तपासून मृत घोषित केले. चंद्रकांत हिरसकर (७०) असे या प्रवाशाचे नाव आहे.

लोकसत्ता

## (६) वृत्तमानस १/१०/२०२३

### बस वाहकाच्या प्रसंगावधनाने गाडीतील 30 ते 35 प्रवाशी बचावले

मुंबई : बेस्ट बस वाहकाच्या प्रसंगावधनाने परवा रात्री १०.४० वाजता बसमधील ३० ते ३५ प्रवाश्यांचे प्राण वाचले, त्या प्रवाशांचे नशीब बलवत्तर म्हणून मोठी दुर्घटना घडता घडता वाचली.लहानु गोपाळा नागरे असे नाव आहे.बस चालकाची प्रकृती आता स्थिर असल्याचे बेस्ट कडून कळविण्यात आले आहे. त्याचे असे झाले की, दिंडोशी आगाराची बस मार्ग क्र. ७०५/ ०८, बस गाडी क्र. ५४३४ ही ३० ते ३५ प्रवाश्यांना घेवून परवा रात्री १०.४० वाजता जात असता बस पुष्पा पार्क (डाऊन) येथे आली असता बस चालक ०१४०५१ यांना गाडी चालवीत असताना चक्कर आल्याने ते आसनावरून चालक केबिनमध्ये खाली पडले. बस गाडीमधील कार्यरत बस वाहक ११२१६३ यांनी प्रसंगावधान राखून हॅण्ड ब्रेक लावल्याने बस गाडी थांबली व पुढील संभाव्य अपघात टळला.

## (७) सामना - १/१०/२०२३

### चालत्या बेस्टमध्ये चालकाला चक्कर

▮ *दिंडोशी* बस आगारातील बस मार्ग क्रमांक ७०५ / ०८ बस नंबर ५४३४ ही बस शनिवारी रात्री १० वाजून ४० मिनिटांच्या सुमाराला पुष्पा पार्क येथे येताच बसचालकाला चक्कर येऊन तो केबिनमध्ये खाली पडला. प्रवाशांच्या ही गोष्ट लक्षात येताच त्यांनी आरडाओरडा केला. बसवाहक लहानू नागरे यांनी प्रसंगावधान राखत केबिनजवळ येत गाडीचा हॅण्डब्रेक लावला आणि बस जागीच थांबली. त्यामुळे मोठा अपघात टळला व ३५ प्रवाशांचे प्राण वाचले.

## (९) नवशक्ति - १/१०/२०२३

### धावत्या बसमध्ये चालकास चक्कर

मुंबई : दिंडोशी बस आगारातील बस मार्ग ७०५ / ०८ ही पुष्पा पार्क येथे येताच बसचालकास चक्कर आली आणि बसच्या केबिनमध्ये खाली पडला. बसचालकास चक्कर येऊन खाली पडल्याचे निदर्शनास येताच बस वाहक लहानू गोपाळा नागरे यांनी हॅण्ड ब्रेक लावत बस थांबवली. बस वाहक लहानू यांच्या प्रसंगावधानामुळे मोठा अनर्थ टळला आणि ३० ते ३५ प्रवासी थोडक्यात बचावले. दिंडोशी बस आगारातील बस मार्ग क्रमांक ७०५ / ०८ बस नंबर ५४३४ ही बस शनिवारी रात्री १०.४० वाजण्याच्या सुमारास पुष्पा पार्क येथे येताच बस चालकास चक्कर येऊन ते खाली पडले. चालकास काय झालं अशी ओरड प्रवाशांनी करताच बस कंडक्टरने केबिनजवळ धाव घेत हॅण्ड ब्रेक लावला आणि बस जागीच थांबली. यावेळी बस मध्ये ३० ते ३५ प्रवासी प्रवास करत होते.

## (८) प्रहार - १/१०/२०२३

#### चालकाला चक्कर येताच बसवर मिळवले नियंत्रण

### वाहकाच्या प्रसंगावधानामुळे टळला बस अपघात

◆ मुंबई (प्रतिनिधी) :



शनिवारी रात्री बस चालवत असताना मालाड येथे बसचालकाला चक्कर आल्यामुळे ते खाली कोसळले. यावेळी प्रसंगावधान दाखवत बस वाहकाने बस गाडीचा हँड ब्रेक दाबून बसवर नियंत्रण मिळवले. त्यामुळे मोठा अपघात टळला.

दिंडोशी आगारातील बस क्रमांक ७०५ मर्यादित वरील बस (५४३४) ही दिंडोशी आगारातून वेस्टर्न पार्क काशिगाव येथे गेली. बस वेस्टर्न पार्क काशिगाव येथून परतत असताना शनिवारी रात्री पावणेअकराच्या सुमारास पुष्पा पार्क मालाड येथे बस आली असताना बसचालक यांना अचानक चक्कर आली व ते बसच्या स्टेअरिंगवर पडले.

बसवाहक लहानू नागरे यांना हे लक्षात येताच त्यांनी त्वरित बसच्या केबिनमध्ये धाव घेत हँड ब्रेक दाबून बसवर नियंत्रण मिळवले व बस सुरक्षित थांबवली. यावेळी बसमध्ये ३० ते ३५ प्रवासी प्रवास करत होते.

बस वाहकाच्या प्रसंगावधानामुळे मोठा अपघात टळला. बेस्ट वाहकाच्या या प्रसंगावधानाचे सर्वत्र कौतुक होत आहे. दरम्यान बसचालकाची प्रकृती स्थिर असल्याचे समजते.

## (१०) सकाळ - १५/१२/२३

# बेस्ट बसवाहकाचा विविध सामाजिक संस्थांकडून सन्मान

घाटकोपर, ता. १४ (बातमीदार) : बेस्टच्या बसमध्ये हृदयविकाराचा झटका आलेल्या प्रवाशाला योग्य प्रथमोपचार देऊन जीवदान देणाऱ्या बेस्टचे वाहक अर्जुन लाड यांचा देवदेश प्रतिष्ठान, घाटकोपर प्रगती मंच आणि छबी सहयोग फाऊंडेशनतर्फे बुधवारी सन्मान करण्यात आला.

१० डिसेंबर रोजी घाटकोपर आगारातील बस मार्ग क्रमांक ३५३ मध्ये प्रवासी रोहिदास रामचंद्र पवार (६२) यांना हृदयविकाराचा झटका आला. त्यानंतर ते बेशुद्ध पडले. त्या वेळेस बसवाहक अर्जुन पांडुरंग लाड यांनी त्यांच्या छातीवर हाताने पम्पिंग करून प्रथमोपचार केले व ताबडतोब पुढील उपचाराकरिता ठाणे येथील कामगार हॉस्पिटल येथे घेऊन आले. या वेळी पुढील औषधोपचार करून त्यांचा जीव वाचविण्यात आला. या घटनेमुळे सगळीकडे बेस्ट वाहकाचे कौतुक होत आहे. त्यामुळे देव देश प्रतिष्ठान, घाटकोपर प्रगती मंच आणि छबी सहयोग फाऊंडेशनच्या वतीने अर्जुन लाड यांचा सन्मान करण्यात आला. या वेळी देव देश प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. वैभव देवगिरकर यांच्या हस्ते सन्मानपत्र आणि प्रोत्साहन राशी देण्यात आली.

सकाळ

## (११) पुण्यनगरी - १५/१२/२०२३


# प्रवाशाचे प्राण वाचवणाऱ्या बेस्टच्या वाहकाचा सन्मान




। मुंबई : बेस्ट बसमध्ये हृदयविकाराचा झटका आलेल्या प्रवाशाला योग्य प्रथोमचार देऊन जीवनदान देणारे बेस्टचे वाहक अर्जुन लाड यांचा देवदेश प्रतिष्ठान, घाटकोपर प्रगती मंच आणि छबी सहयोग फाऊंडेशनच्या वतीने बुधवारी घाटकोपरमध्ये सन्मान करण्यात आला. १० डिसेंबर रोजी घाटकोपर आगारातील बस मार्ग क्र. ४५३ ही घाटकोपर आगार ते लोकमान्य नगर दिशेने जात असताना ठाण्यातील रोड रस्ते क्र. १६ येथे बसमधील प्रवासी रोहिदास रामचंद्र पवार (६२) यांना हृदयविकाराचा झटका आला.

बसमधील प्रवाशाला हृदयविकाराचा झटका आल्याचे पाहून बसवाहक अर्जुन पांडुरंग लाड यांनी त्यांच्या छातीवर हाताने पम्पिंग करून प्रथमोपचार केले व ताबडतोब पुढील उपचाराकरता पवार यांना कामगार हॉस्पिटल ठाणे येथे घेऊन गेले. पुढील औषधोपचार करून त्यांचा जीव वाचवला. या घटनेचे सगळीकडे कौतुक होत असून, संपूर्ण बेस्ट प्रशासनासाठी भूषणावह आहे. देवदेश प्रतिष्ठान, घाटकोपर प्रगती मंच आणि छबी सहयोग फाऊंडेशनच्या आरोग्यमयी राष्ट्रासाठी समर्पित या उद्देशाशी संलग्न 'चला निर्माण करूया राष्ट्र जीवनरक्षकांचे' या मोहिमेंतर्गत अर्जुन लाड या देवदुतांचा सन्मान देवदेश प्रतिष्ठानच्या कार्यालयात करण्यात आला. या वेळी देवदेश प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. वैभव देवगिरकर यांच्या हस्ते सन्मानपत्र आणि प्रोत्साहन राशी देऊन करण्यात आला.

या प्रसंगी डॉ.ओमप्रकाश गजरे, डॉ. शीतल देवगिरकर, डॉ. रवींद्र कांबळे, संभाजी नर्लेकर, प्रदिप भोईर, अभिषेक पवार, अजित खंडागळे, वैभव ठाकरे, पांडुरंग बलकवडे, जितेंद्र पादिर, स्मिता, जयगणेश, अमर चव्हाण हे प्रामुख्याने उपस्थित होते.



# जीवेत शरद: शतम्





**मोहनदास नांबियार**
महाव्यवस्थापकांचे
स्वीय सहाय्यक
सेवानिवृत्ती, दि. ०१-०५-२०२३



**पुजा तावडे**
सहा. कर्मचारीय व्यवस्थापक
कुलाबा
सेवानिवृत्ती, दि. ०१-०६-२०२३



**सुनिल वाझ**
पर्यवेक्षक (वै)
कर्मचारीय विभाग, कुलाबा
सेवानिवृत्ती, दि. ०१-०६-२०२३



**जयराम परब**
पर्यवेक्षक (वै)
कर्मचारीय विभाग, कुलाबा
सेवानिवृत्ती, दि. ०१-०६-२०२३



**नवनाथ म्हाडदळकर**
पर्यवेक्षक (वै) कर्मचारीय
विभाग, कुलाबा
सेवानिवृत्ती, दि. ०१-०७-२०२३



**टि. एल. खंदारे**
मिटर निरिक्षक
ग्राहक सेवा (ई)
सेवानिवृत्ती दि. ०१-०७-२०२३



**कमल शिवणकर**
वरिष्ठ माळी (वै)
कल्याण विभाग (कुलाबा)
सेवानिवृत्ती, दि. ०१-०७-२०२३



**संजय कांबळे**
वरिष्ठ नवघाणी
कल्याण विभाग, कुलाबा
सेवानिवृत्ती, दि. ०१-०७-२०२३



**सुहास नाईक**
वरिष्ठ नवघाणी (वै)
कल्याण विभाग, (कुलाबा)
सेवानिवृत्ती, दि. ०१-०७-२०२३



**धनंजयन नायर**
आ. व्य. वाहतूक,
कुलाबा
सेवानिवृत्ती दि. ०१-०८-२०२३



**रमेश काटकर**
स. आ. व्य. (वाहतूक),
सेंट्रल,
सेवानिवृत्ती दि. ०१-०८-२०२३



**गिरीष पटेल**
स. प्र. अ. वाहतूक (वै),
गोराई
सेवानिवृत्ती, दि. ०१-०८-२०२३

# जीवेत शरदः शतम्



**श्रीकांत खामकर**
स. प्र. अ. वाहतूक (वै),
वडाळा
सेवानिवृत्ती, दि. ०१-०८-२०२३



**यशवंत महाडेश्वर**
पर्यवेक्षक कर्मचारीय
विभाग, कुलाबा
सेवानिवृत्ती दि. ०१-०८-२०२३



**सुनिल बिरमोळे**
पर्यवेक्षक वाहतूक,
वडाळा
सेवानिवृत्ती, दि. ०१-०८-२०२३



**दिनेश मांडेकर**
पर्यवेक्षक (वै),
नि. व. नि., वडाळा
सेवानिवृत्ती, दि. ०१-०८-२०२३



**आर. जी. चव्हाण**
(पर्यवेक्षक (वै),
ग्राहक सेवा (ई)
सेवानिवृत्ती, दि. ०१-०८-२०२३



**पल्लवी प्रकाश राणे**
सहा. प्रशा. अधिकारी (वै)
जनता संपर्क विभाग, कुलाबा
सेवानिवृत्ती, दि. ०१-०९-२०२३



**यु. जे. कारेकर**
विभागीय अभियंता,
ग्राहकसेवा (ई)
सेवानिवृत्ती, दि. ०१-०९-२०२३



**प्रभाकर खळे**
स. आ. व्य. (वाहतूक)
घाटकोपर
सेवानिवृत्ती, दि. ०१-०९-२०२३



**लहू पवार**
स. प्र. व्य. (ति.व.रो.)
वडाळा
सेवानिवृत्ती, दि. ०१-०९-२०२३



**प्रविण खरात**
पर्यवेक्षक (वै)
वरळी
सेवानिवृत्ती, दि. ०१-०९-२०२३




**शशिकांत गावडे**
स. आ. व्य. (वाहतूक)
कुर्ला
सेवानिवृत्ती, दि. ०१-१०-२०२३



**विश्वास पाटील**
वा. अ. वाहतूक
पोयसर
सेवानिवृत्ती, दि. ०१-१०-२०२३



# जीवेत शरदः शतम्





**गजानन तारी**

स. प्र. अ. वाहतूक
वडाळा
सेवानिवृत्ती, दि. ०१-१०-२०२३



**मनिषा सोरटे**

पर्यवेक्षक (वै),
वाहतूक, कुलाबा
सेवानिवृत्ती, दि. ०१-१०-२०२३



**श्रीकांत हाबडे**

(पर्यवेक्षक (वै),
वाहतूक, कुलाबा
सेवानिवृत्ती, दि. ०१-१०-२०२३



**नारायण दळवी**

उप. आ. व्य. (वाहतूक)
प्रशिक्षण केंद्र, दिंडोशी
सेवानिवृत्ती, दि. ०१-११-२०२३



**लक्ष्मीकांत माळवदे**

सहा. सुरक्षा निरिक्षक
कुलाबा
सेवानिवृत्ती, दि. ०१-११-२०२३



**राजेश आनंद**

उप आ. व्य.
सांताक्रुझ
सेवानिवृत्ती, दि. ०१-१२-२०२३



**सदानंद जोशी**


सहा. आ. व्य.
वाहतूक, वडाळा
सेवानिवृत्ती, दि. ०१-१२-२०२३



**अलका कंगले**

वरिष्ठ लघुलेखिका (वै)
ओशिवरा
सेवानिवृत्ती, दि. ०१-१२-२०२३

Digitally published by Sudas Raghuvir Sawant on behalf of (or owned by) Brihanmumbai Electric Supply and Transport Undertaking published at Best Bhavan, Best Marg, Colaba Mumbai - 400001. Post Box No. 192,
EDITOR : SUDAS RAGHUVIR SAWANT R.N.I. No. MAHMUL/2015/68800
The management accept no responsibility for the matter digitally published in the house journal .
Year-9 Issue-Second August to December 2023 Email: probestundertakings@gmail.com Tel.-22799395
DIGITALLY DESIGNED BY : SAWARDEKAR ENTERPRISES
404/4a, Sankalp Siddhi, Near Kumkum, Pratiksha Nagar Sion (E), Mumbai-400022.
Email: sawent.2021@gmail.com Mob: 9869355793/885099493




MAHANAGAR GAS

सीएनजी आहे बेस्ट बसेसच्या जोडीला,
प्रत्येक फेरी हरित बनवित आहे मुंबईला.

आज सुमारे १९८६ बेस्ट ह्या सीएनजी वर धावत आहेत. बेस्ट आणि एमजीएल ह्या हरित उपक्रमाद्वारे मुंबईच्या सर्वात विश्वासार्ह सार्वजनिक वाहतुकीचा चेहरामोहरा बदलण्यासाठी महत्वपूर्ण भूमिका बजावित आहेत. बेस्ट बसमधील तुमचा प्रत्येक प्रवास मुंबईला अधिक हरित बनविण्यासाठी हातभार लावत असते.

**एमजीएल कनेक्ट** हे सीएनजी आणि पीएनजी ग्राहकांसाठी अनेक ग्राहकस्नेही वैशिष्ट्यांसह विकसित करण्यात आलेले आहे. हे ॲप डाउनलोड करण्यासाठी विनामूल्य उपलब्ध आहे.

Switch to MGL e CNG
eco friendly | easily available | economical

MGL House, G-33 Block, Bandra-Kurla Complex, Bandra (E), Mumbai - 400 051, India.
Tel : +91 22 6678 5000 | Email: Info@mahanagargas com | CIN No L40200MH1995PLC088133

/98992 03843 | /mglltdofficial | /mahanagargas | /mahanagargas | /company/mglltd | www.mahanagargas.com